सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई – ४०००३२.

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	पद	पदांची संख्या	प्रवर्ग									
			अनु–सूचित जाती	अनु–सूचित जमाती	विमुक्त जाती (अ)	भटक्या जमाती (ब)	भटक्या जमाती (क)	भटक्या जमाती (ड)	विशेष मागास प्रवर्ग	इतर मागास वर्ग	सर्व साधारण	एकूण
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३
१	कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)	६०	८	४	२	२	२	१	१	११	२९	६०
२	स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक	८०	१०	६	२	२	३	२	२	१५	३८	८०

१. **शैक्षणिक अर्हता** : कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) – स्थापत्य अभियांत्रिकी पदवी / पदविका

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक – १. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेली माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण

२. औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) यांचा १ वर्षांचा बांधकाम शास्त्रातील अभ्यासक्रम / स्थापत्य अभियांत्रिकी पदविका

२. **वयोमर्यादा** : कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) – २१ ते ३० वर्षे

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक – १८ ते ३० वर्षे

३. **एकत्रित मानधन** : कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) – रु. १८,०००/– प्रतिमाह

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक – रु. १०,०००/– प्रतिमाह

उमेदवारांकरिता विशेष सूचना :

१. उमेदवारांची नियुक्ती फक्त विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम योजनेकरिता आहे व योजनेच्या व्याप्ती प्रमाणे कमी अधिक करण्यात येतील. विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम योजनेंतर्गत करण्यात येणारी नियुक्ती पूर्णतः कंत्राटी पद्धतीने दोन वर्षांच्या कालावधीकरिता असेल.

२. सदरहू पदे विदर्भातील ११ जिल्ह्यांसाठी असून निवड झालेल्या उमेदवारांना कामाच्या निकडीनुसार कोणत्याही जिल्ह्यात कामांसाठी नेमणूक करण्यात येईल.

३. मिटकॉन संस्थेची भूमिका : विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या सदर पदाच्या परीक्षेसाठी अर्जाची व्यवस्थापन प्रक्रिया सुकर होण्यासाठी मिटकॉन संस्थेची लॉजिस्टिक पार्टनर (Logistic Partner) म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

४. पात्र उमेदवारांना परीक्षेचा दिनांक, वेळ व परीक्षा केंद्र व्यक्तिगतरीत्या व खालील संकेतस्थळावर कळविण्यात येईल. परीक्षा ६ महसूली मुख्यालयात घेण्यात येतील.

५. विहित अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी त्यांची जन्मतारीख / शैक्षणिक पात्रता / अनुभव इ. प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडून परिपूर्ण अर्ज दिनांक ०९ सप्टेंबर २०१३ पर्यंत मिटकॉन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट, सर्वे नं. ३३/१, छत्रपती क्रीडा संकुल, ऑक्ट्रॉय नाक्याजवळ, बालेवाडी, पुणे ४११०४५ पत्त्यावर पाठवावेत. अर्जाच्या पाकिटावर प्रवर्ग व पदाचे नाव नमूद करावे. दूरध्वनी क्रमांक : ०२०–६६२८९६००.

या विषयी अधिक माहिती, अर्जाचा नमुना, अटी, शर्ती व कामाचे स्वरुपकरिता http://waterconserve.maharashtra.gov.in किंवा www.maharashtra.gov.in किंवा www.mitconindia.com किंवा www.mima.edu.in वेबसाईट पहावी.

प्रमुख उच्चस्तरीय नियंत्रण कक्ष
विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम,
तथा उपसचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विहित नमून्यातील अर्ज

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम Vidarbha Intensive Irrigation Development Programme (VIIDP) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदांसाठी कंत्राटी पध्दतीने भरतीसाठी

जाहिरात दिनांक :

अर्ज केलेल्या पदाचे नाव :

१. अर्जदाराचे नांव : आडनांव प्रथमनांव वडीलांचे नांव

उमेदवाराचा फोटो

२. कायमचा पत्ता :

३. दुरध्वनी क्रमांक (भ्रमणध्वनीसह) :

४. ई-मेल :

५. सध्याचा पत्ता :

६. जन्मतारीख : / / वय : वर्षे

७. राष्ट्रीयत्व :

८. प्रवर्ग :

९. लिंग (✓) करणे : पुरुष / महिला विवाहित / अविवाहित

१०.अवगत भाषा :

११. परीक्षा केंद्र : मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

१२.शैक्षणिक माहिती :

अ.क्र.	परीक्षा	वर्षे	विषय	शाळा /कॉलेजचे नांव	बोर्ड / विद्यापीठ	मिळालेल्या गुणांची टक्केवारी

१३.इतर शैक्षणिक माहिती (संगणक इत्यादी) :

अ.क्र.	अभ्यासक्रम	वर्ष	विषय	संस्थेचे (प्रायोजक) नांव	मिळालेल्या गुणांची टक्केवारी
१					
२					
३					
४					

१४. अनुभव :

अ.क्र.	हुद्दा व वेतन	संस्थेचे नांव व पत्ता	कालावधी	कामाचे स्वरुप
१				
२				
३				
		एकूण		

मला पूर्णपणे माहित आहे की, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम अंमलबजावणीकरिता कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाकरिता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे योजनेच्या कार्यक्रमाच्या व्याप्तीप्रमाणे कमी/ अधिक करण्यात येतील. ही नियुक्ती योजनेच्या अंमलबजावणीकरिता असून करारनाम्यातील मुदतीपर्यंत राहील. कामाच्या निकडीनुसार विदर्भातील कोणत्याही जिल्ह्यात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहितीप्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्व सुचने शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक : **अर्जदाराची सही**

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम अंतर्गत कंत्राटी पध्दतीने भरती करावयाच्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचे साठी अटी व शर्ती व कामांचे स्वरुप

अटी व शर्ती :

१) कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या अभियंत्यांना एकमुश्त (Consolidated) मानधना व्यतिरीक्त इतर कोणतेही वेतन व भत्ते देय राहणार नाही.

२) सदर नियुक्त्या तात्पुरत्या स्वरुपाच्या असल्याने कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती करणाऱ्या प्राधिकरणास राहतील.

३) निवड झालेल्या उमेदवारांना रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर विहित करारनामा करणे बंधनकारक राहिल.

सर्वसाधरण कर्तव्ये :-

१) नियुक्त अभियंत्यास प्रत्येक महिन्यात नियंत्रक अधिकाऱ्याने विहित केलेल्या योजनांचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके सादर करणे बंधनकारक राहिल.

२) योजना बांधकामे सुरु असलेल्या कामांवर देखरेख ठेवणे.

३) योजना बांधकामांविषय अहवाल वेळोवेळी नियंत्रक अधिकाऱ्यास सादर करणे.

४) संधानक (१:२:४, १:३:६) देखरेख ठेवलेल्या प्रत्येक कामावर दिनांक निहाय किती संधानकाचे काम झाले व सिमेंट वापरले गेले याबाबतचा अहवाल सादर करणे.

५) संधानकामध्ये वापरण्यात येणाऱ्या सळयांबाबतचे वर्गीकरण/परिमाण इत्यादीचा अहवाल तयार करुन संबंधीत अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष दाखवून मंजुरी घेणे.

६) विहीत Specification नुसार व उप विभागीय अभियंता/अधिकारी/कार्यकारी अभियंता यांनी बांधकामाबाबत दिलेल्या सूचनांचे वेळोवेळी पालन करुन त्यानुसार बांधकामे पार पाडणे.

७) अंदाजपत्रक मंजुरीसाठी विविधस्तरावर पाठपुरावा करणे.